जगभर

स्वायत्ततेच्या दोन मागण्या : कुर्द व कॅटालान

चन्द्रशेखर पुरन्दरे

इराक

इराकच्या पहिल्या युद्धात सद्दाम हुसेनचा पराभव केल्यानंतर अमेरिकेने उत्तर इराकमधील कुर्दबहुल प्रांत स्वायत्त केला. हा भाग इराकच्या केंद्रीय सत्तेतून जवळ जवळ गेलाच. कुर्द लोकांचे स्वतंत्र राष्ट्राचे स्वप्न मात्र अस्तित्वात आले नाही. नंतर अलीकडे या प्रांतात इस्लामिक स्टेटने जम बसवला. त्यांच्या कट्टर सुन्नी खिलाफातीत हा प्रदेश आणण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. तिला तद्देशीय कुर्द आणि इराकी राजवट, दोन्हींचा विरोध होता. तसाच विरोध शेजारच्या शिया इराणचा होता. या तीन शक्तींनी इस्लामिक स्टेटचा पाडाव केला. या लढाईत आपण इराकला मदत केली, तर आपली स्वातंत्र्याची मागणी आंतरराष्ट्रीय दबावाने इराकला मान्य करावी लागेल असा कुर्द नेतृत्वातील सत्ताधारी गटाचा अंदाज. त्या मागणीला वैधता मिळावी म्हणून त्यांनी सप्टेंबरमध्ये सार्वमत घेतले. ते इराकी सरकारने अवैध ठरवले. या भागाची आर्थिक नाकेबंदी सुरू केली. सार्वमतात बहुतांशी कुर्द लोकांनी इराकपासून विभक्त होण्याचा निर्णय प्रकट केला.

कुर्द लोक सुन्नी मुस्लीम असले तरी ते अरब नाहीत. ते कुर्द वंशाचे आहेत आणि तुर्कस्तान, इराण, इराक़ आणि सीरिया या चार देशात विखुरलेले आहेत. प्रत्येक देशात अल्पसंख्य आहेत. पहिल्या महायुद्धानंतर या देशांच्या सीमा वसाहतवादी पश्चिमेने लादल्या. त्यात कुर्द लोकांकडे दुर्लक्ष झाले. त्यांना त्या सीमा तेव्हापासून मंजूर नाहीत. त्यामुळे प्रत्येक देशाची राजवट त्यांच्याकडे फुटीरतावादी म्हणून संशयाने पहाते. यांना इराकमधून विभक्त होण्याची संधी मिळाली तर उद्या आपल्या देशाचेही विभाजन होईल ही भीती.

किर्कुक हे इराकी कुर्दस्तानातील महत्त्वाचे शहर. ते तेल उत्पादन करते. त्यावर ताबा असणे आधी कुर्द, मग इस्लामिक स्टेट, मग परत कुर्द यांना आवश्यक होते. त्याचा ताबा मिळवणे हे इराकला त्यामुळे गरजेचे. अखेर फार जीवितहानी न होता, किर्कुक इराकने मिळवले. कारण बहुतेक कुर्द सैन्याने शस्त्रे खाली ठेवली. पण या संघर्षात तेथून मोठ्या प्रमाणावर स्थानिक बेघर, निर्वासित झाले. ती मानवी वेदना नेहमीप्रमाणेच कोणत्याच सत्तापिपासू शक्तीच्या खिजगणतीत नाही. कुर्द स्वातंत्र्य आणखी लांबणीवर पडले आहे.

त्याचबरोबर शिया सुन्नी वैर संपण्याची चिन्हे नाहीत, या प्रदेशातील अस्थिरता चालू राहणार. त्यात अमेरिकेच्या चमत्कारिक अनिश्चित धोरणाची भर. इस्लामिक स्टेटविरुद्ध मदत केली म्हणून कुर्द, इराकी राजवट दोन्ही मित्र होते. आता इराक इराणच्या अधिक जवळ जातो आहे म्हटल्यावर ट्रम्प महाशयांना ते मान्य नाही. परत त्यांनी याच वेळी इराणच्या अणु-करारावर संदेह व्यक्त केला आहे. तो अनेक राष्ट्रांनी - चीन व रशियासह - इराण बरोबर केलेला ओबामा राजवटीतील करार रद्द करावा आणि इराणला 'धडा' शिकवावा, ही त्यांची इच्छा. अशा वक्तव्यांनी आगीत तेल पडते. इराण आतापर्यंत सीरियाच्या असद राजवटीचा समर्थक आहे, त्याला लष्करी मदत करतो. तीच परिस्थिती इराकमध्ये. ट्रम्प इराणला चिथवत आहे. तीनही देशात सुन्नी मुस्लिम कचाट्यात आहेत. त्या जाचातून इस्लामिक स्टेटच्या नव्या अवतारात सुन्नी मुस्लिम आतंकवाद परत उभा राहणे ही शक्यता नाकारता येत नाही.

स्पेन

अशीच दुसरी फुटिरतावादी चळवळ स्पेनमध्ये उभी रहिली आहे. तेथील कॅटालोनिया या संपन्न प्रांताला स्पेनमध्ये राहायचे नाही. तो ऐतिहासिक अन्याय आहे अशी त्या लोकांची भावना आहे. त्यांची भाषा, संस्कृती, राष्ट्रवाद भूतकाळापासून आजवर दडपला गेला आहे असे बहुसंख्य कॅटालान लोकांचे मत आहे.

अर्वाचीन काळात २०१४ च्या सार्वमतात ८०% हून अधिक कॅटालान लोकांनी आपले स्वतंत्र राष्ट्र असावे हा कौल दिला. तो केंद्र सरकारने अमान्य केला. तेव्हापासून केंद्र सरकार व कॅटालोनियाचे राज्य सरकार यांच्यात संघर्ष चालू आहे. २०१५ ला राज्य सरकारने २०१७ पर्यंत स्पेनपासून विभक्त होण्याचा निर्णय त्यांच्या संसदेत (विधानसभेत) बहुमताने मंजूर केला. तो न्यायालयाने अवैध ठरवला. तरी ही विभक्ती होणारच असे विधानसभेने ठरवले. मग अनेकदा बार्सिलोना या कॅटालोनियाच्या राजधानीत या मागणीसाठी मोर्चे निघाले, सार्वत्रिक संप झाले. त्याला उत्तर म्हणून माद्रिद या स्पेनच्या राजधानीत असेच मोर्चे ही मागणी स्वीकारू नये म्हणून निघाले.

कॅटालान सरकारने परत एक सार्वमत १ ऑक्टोबरला घेण्याचे जूनमध्ये जाहीर केले. तो निर्णयही अवैध असल्याचे न्यायालयाने सप्टेंबरमध्ये जाहीर केले. तरी १ ऑक्टोबरला मतदान झालेच. ते नीट होऊ नये, हिंसा होऊ नये म्हणून केंद्र सरकारने मोठा

पोलीस बंदोबस्त केला. काही मतदान केंद्रे वेळेआधीच बंद करण्यात आली, विरोधकांना काही ठिकाणी मारहाणही झाली. तरी ९०% हून अधिक लोकांनी स्वायत्ततेच्या बाजूने मतदान केले. परत, केंद्राने हा कौल फेटाळला, युरोपियन युनिअननेही सार्वमत अवैध असल्याचे जाहीर केले. त्यावर परत निषेधाच्या घटना घडल्या. लेख लिहिण्याच्या वेळी हा तिढा कायम आहे. दोन्ही बाजू आपण म्हणतो तीच लोकशाही या भूमिकेवर ठाम आहेत.

(दरम्यान कॅटालोनियाने २७ ऑक्टोबरला आपण स्वतंत्र राष्ट्र असल्याचे जाहीर केले. प्रत्युत्तर म्हणून काही तासांतच केंद्र सरकारने कॅटालोनियाची विधानसभा बरखास्त केली आणि २१ डिसेंबरला नव्या निवडणुकांची घोषणाही केली आहे.)

दोन मागण्यांतील भेद

इराक-कुर्द आणि कॅटालान यातील भेद लक्षणीय आहे. एकतर स्पेनमध्ये शासकीय हिंसा जवळजवळ नाहीच. इराकमध्ये जी बाजू हिंसा जास्त करते, ती प्रश्नाचे उत्तर ठरवते. दुसरे, तथाकथित वाटाघाटी हा एकच मार्ग श्रेयस्कर आणि प्रभावी असतो ही दंतकथा दिसते. वाटाघाटी स्पेनमध्ये वर्षानुवर्षे चालू आहेत. प्रश्न एव्हाना सुटायला हवा होता. इराकमध्ये वाटाघाटी आता सुरू होणार. जिंकला कोण तो त्यांची दिशा ठरवणार असेल तर त्यांचे निष्पन्न दीर्घकालीन स्थैर्यात होईल असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

wwww.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

✦